RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १०, अंक ६३(२५)] बुधवार, ऑक्टोबर ९, २०२४/आश्विन १७, शके १९४६ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक १३९**

**प्राधिकृत प्रकाशन**

### विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडून

**अनुसूची-V**

महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी विभागीय आयुक्तांनी प्रसिद्ध करावयाच्या अधिसूचनेचा नमुना.

**अधिसूचना**

क्रमांक मशा/कार्या-५/प्रशासन/पेसा/एस.आर-९९/ई २५०५४०६/सी.आर-६९६/२०२४ .—महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधिचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पाडा/ पाड्यांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, वाडी/वाड्यांचा समुह गाव म्हणुन विनिर्दिष्ट करण्यात येते ;

आणि ज्याअर्थी, **विक्रमगड** तालुक्यातील **वेहेलपाडा** ग्रामपंचायतीतील **आळीवपाडा**/ वस्ती/ पाड्यांचा समुह / वस्त्यांचा समुह यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ प्रमाणे दिनांक **२५ मार्च २०२२** रोजी गाव जाहीर करण्यासंदर्भात ठराव केलेला आहे ;

आणि, ज्याअर्थी, **उपविभागीय अधिकारी, वाडा विभाग, वाडा** यांनी यासंदर्भात दिनांक **१ जून २०२३** रोजी **वेहेलपाडा** ग्रामपंचायतीत येणाऱ्या पाडा/वस्ती/पाडयाचा समुह/वस्त्यांचा समुह यांची संबधित नोंदणीकृत मतदार व स्थानिक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चौकशी केली आहे ;

आणि, ज्याअर्थी, **जिल्हाधिकारी, पालघर** यांनी चौकशी अंती संबंधित पाडा/ वस्ती/ पाड्यांचा समुह/ वस्त्यांचा समुह यांना गाव घोषित करण्याची शिफारस केलेली आहे.

आणि, त्याअर्थी, मी, **विकास पानसरे, विभागीय आयुक्त, कोकण विभाग** पेसा नियमाच्या नियम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **विक्रमगड** तालुक्यातील **वेहेलपाडा** ग्रामपंचायतीतील **आळीवपाडा** येथे पाडा/वस्ती/ पाड्यांचा समुह/वस्त्यांचा समुह यास पेसा नियम ४ अंतर्गत गाव घोषित करीत आहे.

सदर गावांच्या नैसर्गिक हद्दीचे तपशील तसेच संबंधित नैसर्गिक साधनांच्या वापराची पारंपारिक हद्द खालीलप्रमाणे आहे :—

| अ. क्र. | हद्दीचे तपशील | समुह नंबर/ कम्पार्टमेंट नंबर | इतर खुणा (आवश्यक असल्यास) |
|---|---|---|---|
| १. | **उत्तरेस** | ३७५, १६८ | वाणी डोंगरी, नगार माळ |
| २. | **दक्षिणेस** | ३८१, १६८ | शिवाचा बेहडा |
| ३. | **पुर्वेस** | ३७८, १६८ | मातेरा (दुरुंग) |
| ४. | **पश्चिमेस** | ११५, १९५ | जरी-मरी (देवस्थान) |

सदर गाव जाहीर केल्यानंतर जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळुन उरलेले क्षेत्र मुळ गाव म्हणुन ओळखले जाईल. या गावासाठी पेसा अधिनियमातील तरतुदी व नियमातील तरतुदी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कोंकण भवन, नवी मुंबई,
दिनांक २ ऑक्टोबर २०२४.

**विकास पानसरे,**
विभागीय आयुक्त, कोकण विभाग.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.